सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ७२ | शनिवार, दि. ६ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## 'महातेजाय मार्गदर्शिका' प्रकाशन सोहळा...




अमळनेर : मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर संचलित श्री मंगळग्रह मंदिरात शुक्रवार, दि. ५ डिसेंबर रोजी ' महातेजाय मार्गदर्शिका ' या मासिकाचे प्रकाशन करताना मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव एस. बी. बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी, विश्वस्त अनिल अहिरराव, श्रीमती जयश्री साबे. शेजारी सेवानिवृत्त शिक्षक हेमलाल नंदवे, व्हॉईस ऑफ मीडियाचे अमळनेर तालुकाध्यक्ष उमेश काटे, जिल्हा संघटक जयेश काटे, ए. आर. बडगुजर. याप्रसंगी ' महातेजाय मार्गदर्शिका 'चे संपादक पुषंद ढाके, मंगल परिवारातील डी. ए. सोनवणे, बाळा पवार, सौ. आशाताई महाले यांच्यासह दै. ग्लोबल महातेज परिवार, मंगल सेवेकरी व मंदिराचे सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. (छायाचित्र : मयूर चौधरी, अमळनेर)

### दिनविशेष
०६ डिसेंबर

- भारतीय होमगार्ड संघटनेची स्थापना झाली
- भारताने बांगलादेशला मान्यता दिल्यानंतर पाकिस्तानने भारताशी राजनैतिक संबंध तोडले

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

# विद्यार्थिनींच्या छेडखानीविरुद्ध आज महाआंदोलन- मोर्चा

## दै. ग्लोबल महातेज व विविध संघटनांचा असणार सहभाग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथे विद्यार्थिनींची रोज होणारी छेडखानी, गुंडांचा हैदोस यामुळे काही अघटीत व अप्रिय घटना होऊ नये यासाठी वेळीच कायमस्वरूपी, ठोस, कठोर प्रतिबंधकात्मक कारवाई व्हावी, यासाठी शनिवार, दि. ६ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता धुळे रोडवरील साने गुरुजी विद्यालयाच्या प्रांगणातून महाआंदोलन- मोर्चा निघून तो प्रांताधिकारी कार्यालयात जाणार आहे. तेथे पोलिसांसह प्रांताधिकारी व तहसीलदारांना मोर्चेकरी निवेदन देतील. या मोर्चात मुलींच्या सर्व शाळा, सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थिनी, सर्व खासगी क्लासेसमधील विद्यार्थिनी, सर्व महिला मंडळे व सेवाभावी संस्था, डॉक्टर्स सहभागी होतील. तरी शहरासह तालुक्यातील विविध क्षेत्रांतील नागरिकांनी या महाआंदोलन- मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन दै. ग्लोबल महातेज व विविध संघटनांतर्फे करण्यात आले आहे.

दरम्यान, या मोर्चासंदर्भात दै. ग्लोबल महातेजने व्यापक महाआंदोलन उभारण्यासंदर्भात २७ नोव्हेंबर रोजी शहरातील आयएमए लायन्स हॉलमध्ये बैठक झाली होती. त्यात विविध शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, संस्था व संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. त्यात ६ डिसेंबर २०२५ रोजी महाआंदोलन- मोर्चा काढण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला होता. त्याअनुषंगाने पोलीस व प्रशासनाचे या मोर्चाकडे लक्ष वेधण्यासाठी १ डिसेंबर रोजी नियोजीत मोर्चाबाबत संबधितांना निवेदन देण्यात आलेले आहे.

तरी या महाआंदोलन- मोर्चात मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून आपापल्या लेकी- बाळींसह माता भगिनींची होणारी समाजकंटक, गुंडांकडून होणारी छेडखानी कायमस्वरूपी थांबवावी, असे आवाहन दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे करण्यात आले आहे.




# जळगावच्या ३४ आदिवासी गावांचा 'धरती आबा' योजनेत समावेश करा

## खासदार स्मितताताई वाघ यांची संसदेत मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




अमळनेर- जळगाव लोकसभा क्षेत्रातील अनुसूचित जमाती बहुसंख्य असलेल्या ३४ गावांना केंद्र सरकारच्या "धरती आबा जनजातीय ग्राम उत्थान अभियानात" समाविष्ट करावे. त्यांना करून विकासाचा हक्क द्यावा, अशी मागणी खासदार स्मितताताई वाघ यांनी शुक्रवार, दि. ५ डिसेंबर रोजी संसदेत केली आहे. याबाबत खासदार स्मितताताई वाघ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रात म्हटले आहे, की अमळनेर, भडगाव, पाचोरा, चाळीसगाव, धरणगाव, एरंडोल, पारोळा, जळगाव या तालुक्यातील ही गावे अनुसूचित जमातीची ५० टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेली आहेत. मात्र, तरीही या गावांचा समावेश "धरती आबा जनजातीय ग्राम उत्थान अभियानात" करण्यात आलेला नाही. त्यामुळे या गावांमध्ये दर्जेदार शिक्षण, आरोग्यसेवा, पिण्याचे पाणी, रस्ते, डिजिटल सेवा आणि रोजगाराच्या संधींची कमतरता आहे. या गावांचा विकास योजनांपासून झालेला दीर्घकाळचा तुटवडा त्वरीत दूर करण्यासाठी आणि जनजातीय समाजाला मुख्य प्रवाहाशी जोडण्यासाठी "धरती आबा अभियान" उपयुक्त ठरेल. या गावांना विकासाच्या प्रवाहात आणले नाही, तर विषमता वाढेल. क्षेत्राची प्रगती रोखली जाईल. जनजातीय समाजाच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष करणे म्हणजे त्यांचा भविष्यकाळ धोक्यात त्यामुळे या गावांना विकासाचा समान हक्क मिळालाच पाहिजे. या निर्णयामुळे या बांधवांच्या जीवनमानात आमूलाग्र सुधारणा होईल. जळगाव जिल्ह्याच्या संतुलित व सर्वांगीण विकासाचा मार्ग सुकर होईल.



# जागतिक मृदादिनानिमित्त मेहेरगावला जमीन आरोग्य पत्रिका वाटप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- तालुक्यातील मेहेरगाव येथे शनिवार, दि. ५ डिसेंबर रोजी जागतिक मृदा दिनानिमित्त शेतकऱ्यांना जमीन आरोग्य पत्रिकेचे वाटप करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांना जमिनीच्या आरोग्याविषयीचे महत्व सांगण्यात आले.

चंद्रादित्य माती पाणी परीक्षण प्रयोगशाळा (चाळीसगाव) येथील विश्लेषक सचिन वाघ यांनी मार्गदर्शन केले. उपकृषी अधिकारी योगेश वंजारी यांनी माती परीक्षणा विषयी माहिती दिली. सहाय्यक कृषि अधिकारी दीपक चौधरी यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास मेहरगावचे सरपंच राकेश ठाकरे, कुंदन पाटील, शेखर पाटील, बळवंत पाटील, मुरलीधर पाटील, जितेंद्र पाटील, विनोद कोळी, राहुल पाटील यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

### शास्त्रज्ञांनी शोधला पृथ्वी आणि मंगळ यांच्यातील वेळेचा फरक!



पान ३ वर...

## खानदेश शिक्षण मंडळ निवडणूक

# आशीर्वाद पॅनल आज वाढविणार प्रचार नारळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- खानदेश शिक्षण मंडळाच्या त्रैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. या पार्श्वभूमीवर 'आशीर्वाद पॅनल'चा शनिवार, दि. ६ डिसेंबर रोजी सकाळी साडे नऊ वाजता संत सखाराम महाराज वाडी संस्थान येथे प्रचार नारळ वाढविला जाणार आहे.

या कार्यक्रमास खानदेश शिक्षण मंडळाच्या सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पॅनलप्रमुख श्री. विनोद पाटील, श्री. कुंदनलाल अग्रवाल, श्री. बजरंगलाल अग्रवाल, श्री. किर्तीकुमार शहा, श्री. मोहनलाल जैन व आशीर्वाद पॅनलचे उमेदवार श्री. नीरज अग्रवाल, श्री. योगेश मुंदडे, श्री. प्रदीप अग्रवाल, श्री. कल्याण पाटील, डॉ. श्री. संदेश गुजराथी, डॉ. श्री. अनिल शिंदे, श्री. जितेंद्र जैन, श्री. हरी भिका वाणी यांनी केले आहे. नारळ वाढविल्यानंतर विविध भागात प्रचार सुरू होईल.

# अमळनेरला चाकूचा धाक दाखवून मारहाण केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध पोलिसात गुन्हा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर- येथील माजी नगरसेवक सलीम टोपी यांच्या आंबेडकर चौकातील कार्यालयासमोर चाकूचा धाक दाखवून शिवीगाळ व मारहाण केल्याची गंभीर घटना बुधवार, दि. ३ डिसेंबर रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास घडली होती. त्यात दोन जण गंभीर जखमी झाले होते. यासंदर्भात दर्गाअली मोहल्ला, गांधलीपुरा येथील दोघांविरूद्ध येथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांनी सांगितले, की फळ विक्रेते कादीर अली नूर अली सय्यद हे ३ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजता सलीम टोपी यांच्या कार्यालयात बसलेले होते. त्यावेळी त्याच गल्लीत राहणारे कैसर अली आबीद अली व अजमल अली शौकत अली उर्फ बल्ली हे कार्यालयासमोर आले. मागील भांडणाच्या कारणावरून त्यांनी रस्त्यावर उभे राहून कादीर अली नूर अली सय्यद यांना चाकू दाखवून शिवीगाळ केली. यावेळी इरफान शेख शफिउद्दिन व अजहर शेख रफिउद्दिन यांनी कार्यालयाबाहेर येऊन विरोध केला असता दोघांनीही लाथाबुयांनी मारहाण केली. यात अजमल अली शौकत अली उर्फ बल्ली याने काचेच्या दरवाजाची चौकट उचलून अजहर शेख रफिउद्दिन याच्या डोक्यात मारून गंभीर जखमी केले. तसेच जीवे ठार मारण्याची धमकीही दिली. गंभीर जखमी झालेले अजहर यांना तात्काळ ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रथमोपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी धुळे येथील भाऊसाहेब हिरे मेडिकल कॉलेजमध्ये दाखल करण्यात आले. याबाबत कैसर अली आबीद अली व अजमल अली शौकत अली उर्फ बल्ली यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक समाधान गायकवाड, हवालदार विनोद सोनवणे तपास करीत आहेत.

# मंगरूळ- पिंपळे रस्त्याची चाळण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : तालुक्यातील मंगरूळ ते पिंपळे रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. या रस्त्याचे काम काही महिन्यांपूर्वी सुरू झाले होते. मात्र, मध्येच हे काम बंद करण्यात आले आहे.

रस्त्याच्या साइड पट्ट्यांचेही काम अद्याप झालेले नाही. रस्त्यावर खड्डेच खड्डे असल्याने कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे प्रवाशांसह नागरिक त्रस्त झाले आहेत. ठेकेदाराने साईड पट्ट्यांकडे दुर्लक्ष केले आहे. परिणामी समोरासमोरून येणाऱ्या वाहनांना पास होण्यासाठी अक्षरशः कसरत करावी लागत आहे. रुंदी कमी असल्याने अनेक वेळा वाहने चिखलात किंवा कडेला उतरण्याची वेळ येते. त्यातच सुमारे एक किलोमीटर रस्त्याचे कामही अपूर्ण आहे. खड्डे टाळण्यासाठी दुचाकीस्वार आणि चारचाकी वाहनचालकांचा जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. किरकोळ अपघातांचे प्रमाण वाढले आहे. काम मंजूर असूनही ठेकेदाराने आवश्यक दुरुस्ती व रस्ता पूर्ण न केल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने गांभिर्याने लक्ष द्यावे. ठेकेदाराला समज देऊन गुणवत्तापूर्ण काम करावे, अशी मागणी होत आहे.



# कॅनडामधून भारतीय नागरिकांची वाढती डिपोर्टेशन : नेमके कारण काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कॅनडामधून भारतीय नागरिकांना बळजबरीने बाहेर काढण्याची संख्या गेल्या सहा वर्षांत सातत्याने वाढत आहे. कॅनडियन बॉर्डर सर्व्हिसेस एजन्सीच्या आकडेवारीनुसार २०१९ मध्ये केवळ ६२५ भारतीय नागरिक डिपोर्ट करण्यात आले. २०२४ मध्ये हा आकडा १,९३२ पर्यंत पोहोचला. एक रेकॉर्ड उच्चांक. यामुळे भारत हा कॅनडामधून दुसरा सर्वाधिक डिपोर्ट होणारा देश ठरला आहे.

### आकडेवारी एका नजरेत

मेक्सिको : २०२४ मध्ये ३,५७९ नागरिक डिपोर्ट (सर्वाधिक).
भारत : २०२४ मध्ये १,९३२ नागरिक डिपोर्ट.
कोलंबिया : २०२४ मध्ये ९८१ नागरिक डिपोर्ट.
एकूण डिपोर्टेशनमध्ये भारतीय नागरिकांचा वाटा ११.५ टक्के इतका आहे. जो २०२३ च्या ७.५ टक्क्यांपेक्षा दुप्पट आहे. सध्या ६,८०० हून अधिक भारतीय नागरिकांच्या डिपोर्टेशन प्रक्रिया सुरू आहेत. जी कॅनडातील सर्वाधिक प्रलंबित प्रकरणे आहेत.




### डिपोर्टेशनचे प्रमुख कारणे

कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनी या आठवड्यात टोरंटो येथे बोलताना सांगितले, की इमिग्रेशन सिस्टममध्ये सुधारणा करण्यासाठी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या किंवा गुन्ह्यांशी संबंधित व्यक्तींना प्राधान्याने डिपोर्ट केले जात आहे. यात खालील गोष्टींचा समावेश आहे.
गुन्हेगारी : आयोजित गुन्हेगारी, मानवी हक्क उल्लंघन आणि इतर गुन्हे.
**व्हिसा नियमांचे उल्लंघन :** अवैध राहणी, अभयारण्य (रिफ्युजी) दावे फेटाळणे.
**सुरक्षा धोका :** कॅनडाच्या सुरक्षेसाठी धोका असलेल्या व्यक्तींना प्राधान्य.
सीबीएसएच्या प्रवया जैक्केलिन रोबी यांनी सांगितले, की हे उपाय कॅनडाच्या इमिग्रेशन सिस्टमची अखंडता राखण्यासाठी आवश्यक आहेत. गेल्या वर्षी एकूण १६, ७८१ परदेशी नागरिक डिपोर्ट करण्यात आले. ज्यात भारतीयांचा वाटा लक्षणीय आहे.

### भारतीयांवर होणारा परिणाम

भारतीय विद्यार्थी, व्यावसायिक आणि कुटुंबांना याचा मोठा फटका बसला आहे. कॅनडामधील भारतीय समुदायात (विशेषतः टोरंटो आणि ब्रॅम्प्टनमध्ये) चिंता वाढली आहे. याशिवाय अमेरिकेतील एच १बी व्हिसा शुल्क वाढ आणि शिक्षण नियमांमुळे परदेशी संधींवर दबाव वाढला आहे. मात्र, कॅनडातील डिपोर्टेशन ही मुख्यतः गुन्हे आणि नियमभंगाशी संबंधित असल्याचे सीबीएसएने स्पष्ट केले आहे.

### भविष्यातील शक्यता

२०२५ मध्येही ही संख्या वाढण्याची शक्यता आहे. कारण जुलै २०२५ पर्यंतच १,८९१ भारतीय डिपोर्ट झाले आहेत. २०२४ च्या एकूण आकड्यापेक्षा जास्त. कॅनडा सरकार इमिग्रेशन प्रक्रिया वेगवान करण्यासाठी नवीन संसाधने आणि ट्रॅकिंग सिस्टम विकसित करत आहे. कॅनडातील भारतीयांना नियमांचे पालन करणे आणि कायदेशीर मार्गाने राहणे महत्त्वाचे आहे. अधिक माहितीसाठी सीबीएसएच्या अधिकृत वेबसाइटला भेट द्या.

# ३ महिन्यांत १००० कोटींचा फायदा;

## चांदीच्या किमतींनी वेदांताचा ‘ हिंदुस्तान झिंक ’ मालामाल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



चांदीच्या किमतींमध्ये झालेल्या प्रचंड वाढीमुळे अब्जाधीश उद्योगपती अनिल अग्रवाल यांच्या वेदांता ग्रुपच्या हिंदुस्तान झिंक लिमिटेड कंपनीने मोठा नफा कमावला आहे. चालू आर्थिक वर्षाच्या सप्टेंबर तिमाहीत करानंतर कंपनीचा एकत्रित नफा २,६४९ कोटी रुपये झाला आहे. हा नफा मागील तिमाहीच्या तुलनेत १९ टक्क्यांनी जास्त आहे. या नफ्यात एकट्या चांदीच्या व्यवसायाचा ४० टक्के वाटा म्हणजेच सुमारे १,०६० कोटी रुपये आहे. जागतिक स्तरावर टॉप-५ उत्पादकांमध्ये स्थानहिंदुस्तान झिंक लिमिटेड ही जगातील टॉप-५ चांदी उत्पादक कंपन्यांपैकी एक आहे. सप्टेंबर तिमाहीत कंपनीचे चांदी उत्पन्न १,७०६ कोटी रुपये होते. हे उत्पन्न तिमाही आधारावर १० टक्क्यांनी, तर वार्षिक आधारावर २० टक्क्यांनी वाढले आहे.जागतिक बाजारात चांदीच्या भावांत झालेल्या तीव्र वाढीमुळे कंपनीला प्रचंड फायदा झाला असून, तिच्या एकूण आर्थिक कामगिरीत लक्षणीय सुधारणा दिसून आली आहे. शिसे आणि जस्त या धातूंसोबत नैसर्गिकरित्या आढळणाऱ्या चांदीचे खनन आणि शुद्धीकरण हिंदुस्तान झिंक करते. कंपनीच्या उत्पन्नात या विभागाचा वाटा सातत्याने वाढत आहे.विक्रमी उत्पन्न आणि कमी खर्चचालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत हिंदुस्तान झिंकने आतापर्यंतचे सर्वाधिक उत्पन्न ८,५४९ कोटी रुपये नोंदविले आहे. जे मागील तिमाहीपेक्षा १० टक्क्यांनी जास्त आहे. या कालावधीत कंपनीचा इबिट्डा मार्जिन ५२ टक्के राहिला आहे. टेक्नॉलॉजी अपग्रेड्स आणि ऑपरेशनल कार्यक्षमतेमुळे कंपनीने मागील पाच वर्षांतील सर्वात कमी झिंक उत्पादन खर्च साध्य केला आहे.

### चांदीत जबरदस्त तेजी

२०२५ मध्ये आतापर्यंत चांदीच्या दरांत मोठी तेजी दिसून आली आहे. ईटीएफ गुंतवणुकींनी गुंतवणूकदारांचे पैसे जवळपास दुप्पट केले आहेत. फ्युचर मार्केटमध्ये चांदीच्या किमतींमध्ये सुमारे ७० टक्क्यांची उसळी आली आहे. ज्याचा थेट फायदा हिंदुस्तान झिंक लिमिटेडला झाला आहे. या मजकुराचा टोन अधिक औपचारिक ठेवू का, की बातमीच्या वेबसाइटसाठी थोडा संवादात्मक शैलीत लिहू?

# जगातील सर्वांत छोटा हवाई मार्ग : फक्त ९० सेकंदांचा थरारक प्रवास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




विमान प्रवास हा लांब अंतरासाठी जलद माध्यम आहे. जगात एक असा मार्ग आहे, की जेथे टेकऑफ आणि लँडिंगमध्येच संपूर्ण प्रवास संपतो. हा जगातील सर्वांत छोटा व्यावसायिक हवाई मार्ग आहे. जो फक्त ९० सेकंदांचा आहे. विमानाने जाण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. हा दोन बेटांमधील अंतर आहे आहे. १९६७ पासून (५८ वर्षांपासून) सुरू असलेली ही सेवा स्कॉटलंडमधील ऑर्कनी बेटांवर चालते. पर्यटकांसाठी थरार आणि स्थानिकांसाठी जीवनरेखा असलेला हा मार्ग जाणून घेऊया.

### कुठे आहे हा अनोखा मार्ग?

**बेटांचे नाव :** वेस्टरे आणि पापा वेस्ट्रे स्कॉटलंडमधील ऑर्कनी आयलंड्समध्ये.
**अंतर :** फक्त २.७३ किलोमीटर (१.७ मैल).
**विमान कंपनी :** लोगनएअर एअरलाइन्स
**विमान प्रकार :** छोटे ब्रिटन-नॉर्मन आइसलँडर विमान, ज्यात ८ प्रवासी बसू शकतात.
**सेवा सुरू :** १९६७ पासून. शनिवार वगळता दररोज चालते (आता आठवड्यातून काही दिवस).

**इंधन वापर :** फक्त १० किलोग्रॅम इतके कमी की ते पर्यावरणस्नेही आहे. हे अंतर इतके छोटे आहे, की विमान उड्डाण करताच लगेच उतरते. प्रवासादरम्यान प्रवाशांना खड काळ किनारपट्टी, निळे समुद्र आणि हिरवीगार बेटांचे चित्तथरारक दृश्य दिसते. पण हवामान खराब असल्यास (धुके, वारे) उड्डाण रद्द होते. ज्यामुळे थरार आणखी वाढतो.

### तिकीट आणि खर्च

**तिकीट किंमत :** सुमारे ४५ पौंड (अंदाजे ५,००० रुपये). स्थानिकांसाठी सबसिडी असते. पर्यटकांसाठी स्पेशल तिकिटे उपलब्ध.
**बुकिंग :** लोगनएअरच्या वेबसाइटवरून. पर्यटक खास या थरारासाठी येतात व सोशल मीडियावर शेअर करतात.

### स्थानिकांसाठी जीवनरेखा

हे बेट इतके छोटे आणि दुर्गम आहेत की रस्ता किंवा पूल नाहीत. त्यामुळे -
- शिक्षक, डॉक्टर, विद्यार्थी आणि इतर स्थानिक दररोज या सेवेचा वापर करतात.
- मेल, औषधे आणि आवश्यक वस्तूंची ने-आणही याच विमानाने होते.
- छोट्या बेटांसाठी ही सेवा ‘ लाइफलाइन ’ आहे. ज्यामुळे लांब अंतर नव्हे तर अगदी कमी अंतरासाठीही हवाई प्रवास आवश्यक ठरतो.

### इतिहास आणि विक्रम

**विक्रम :** गॅनिस वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये नोंदलेला जगातील सर्वात छोटा व्यावसायिक उड्डाण मार्‌ग.
**सुरूवात :** १९६७ मध्ये स्थानिक गरजेसाठी सुरू. आता पर्यटनाला चालना मिळाली.
**थरारक बाबी :** कमी उंचीवर उड्डाण, समुद्रावरून जाताना येणारे वारे आणि छोटे रनवे यामुळे प्रवास रोमांचक असतो. पण सुरक्षा उच्च पातळीची आहे लोगनएअर कधीही अपघात न झालेली कंपनी आहे. हा मार्ग दाखवतो की हवाई सेवा केवळ लक्झरी नव्हे, तर दुर्गम भागातील जीवनाचा भाग आहे. जर तुम्ही ॲडव्हेंचर प्रेमी असाल, तर एकदा हा ९० सेकंदांचा प्रवास नक्की ट्राय करा.

# आठवीं में खोई आंखों की रोशनी

## मां के साथ और टेक्नोलॉजी की मदद से मनु गर्ग ने हासिल की ९१ वीं रैंक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संघ लोक सेवा आयोग (यूपीएससी) की परीक्षा देश की सबसे कठिन परीक्षाओं में से एक है, जिसमें लाखों अभ्यर्थी हिस्सा लेते हैं, लेकिन सफलता कुछ ही हासिल कर पाते हैं। ऐसी ही एक प्रेरणादायक कहानी है जयपुर के मनु गर्ग की, जिन्होंने दृष्टिबाधा को अपनी कमजोरी नहीं बनने दिया और यूपीएससी २०२४ में ९१ वीं रैंक हासिल कर इतिहास रचा।

### आठवीं में खोई रोशनी, मां बनीं सहारा

जयपुर के शास्त्री नगर के रहने वाले मनु गर्ग आठवीं कक्षा में थे जब एक रेयर जेनेटिक डिसऑर्डर के कारण उनकी आंखों की रोशनी पूरी तरह चली गई। ब्लैकबोर्ड देखना असंभव हो गया, और डॉक्टरों के कई प्रयासों के बावजूद कोई फायदा नहीं हुआ। इस मुश्किल वक्त में उनकी मां उनकी सबसे बड़ी ताकत बनीं। वह किताबें पढ़कर सुनातीं, स्टडी मैटेरियल व्यवस्थित करतीं और हर कदम पर उनका हौसला बढ़ातीं।

### शिक्षा और उपलब्धियां

मनु की स्कूलिंग जयपुर के प्रतिष्ठित सेंट जेवियर्स स्कूल से हुई। इसके बाद उन्होंने दिल्ली यूनिवर्सिटी के हिंदू कॉलेज से पॉलिटिकल साइंस में डिग्री और जवाहरलाल नेहरू यूनिवर्सिटी से मास्टर्स किया। पढ़ाई में हमेशा अव्वल रहने वाले मनु कॉलेज में स्टार डिबेटर के रूप में उभरे। उन्होंने देशभर में १५० से ज्यादा वाद-विवाद प्रतियोगिताओं में जीत हासिल की। मनु कहते हैं, “वाद-विवाद ने मुझे एक आवाज दी, जिसने उस दुनिया में पहचान दिलाई जहां लोग अक्सर नजरें फेर लेते हैं।”

### यूपीएससी की राह और टेक्नोलॉजी का साथ

यूपीएससी की तैयारी के लिए मनु ने टेक्नोलॉजी का सहारा लिया। स्क्रीन रीडर, टॉकबैक टूल, ऑडियो पीडीएफ और ऑप्टिकल कैरेक्टर रिकग्निशन सॉफ्टवेयर की मदद से उन्होंने पढ़ाई की। वैकल्पिक विषय के रूप में राजनीति विज्ञान और अंतरराष्ट्रीय संबंध चुना। २०२३ में पहले प्रयास में वह प्रीलिम्स तो पास कर गए, लेकिन मेन्स में असफल रहे। हार नहीं मानते हुए, मां के अटूट समर्थन और अपनी मेहनत के दम पर मनु ने २०२४ में दूसरे प्रयास में ९१ वीं रैंक हासिल की।



### प्रेरणा की मिसाल

मनु गर्ग की कहानी दर्शाती है कि दृढ़ इच्छाशक्ति, परिवार का साथ और सही संसाधनों के उपयोग से कोई भी बाधा छोटी पड़ सकती है। उनकी सफलता न केवल उनके लिए, बल्कि उन सभी के लिए प्रेरणा है जो मुश्किलों के सामने हार मान लेते हैं।

# भारतातील १५ चित्रविचित्र रहस्यमयी जागा...




**१) उंदरांचे मंदिर :**
करणी माता मंदिर, राजस्थान- बिकानेरपासून ३० किलोमीटर अंतरावर असणारे हे मंदिर २० हजार उंदरांचे घर आहे. इतकेच नव्हे, तर येथे उंदरांची पूजाही केली जाते. हे उंदिर म्हणजे देवीचा अवतार असल्याचे येथे मानले जाते.

**२) पक्ष्यांची सामूहिक आत्महत्या (जतिंगा, आसाम) :**
सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात आसाममधील जतिंगा गावात स्थलांतर करणारे हजारो पक्षी अतिवेगाने उडत येतात. येथील झाडांना आणि घरांना मुद्दामहून आपटतात आणि मरण पावतात. ते असे का करतात, हे एक मोठे कोडे आहे.

**३) लोकतकचा तरंगता तलाव- मणिपूर :**
मणिपूरचा लोकतक तलाव हा जगातील एक नैसर्गिक आश्चर्य आहे. या तलावात अनेक अशी बेटे आहेत जी तरंगत राहतात. माणसे या बेटांवर शेती करतात. तसेच तेथे जगातील काही दुर्मिळ प्राणीही आढळतात. दरवर्षी हजारो पर्यटक या बेटांना भेट देतात.

**४) रूपकुंड तलाव उत्तराखंड :**
उत्तराखंडात हिमालयाच्या कुशीत १६ हजार ५०० फुटांवर रूपकुंड तलाव आहे. येथे कोणत्याही प्रकारची मानवी वस्ती अस्तित्वात नाही. तरीही येथे नवव्या शतकातील ६०० मानवी सांगाडे सापडले आहेत. हे सांगाडे येथे कसे आले त्याची कोणालाही माहिती नाही.

**५) कुंभलगड किल्ल्याच्या भिंती- राजस्थान :**
चीनच्या ग्रेट वॉलबद्दल तर आपल्याला माहिती आहेच. पण राजस्थानातील कुंभलगड किल्ल्याला असलेली ३६ किलोमीटरची भिंत ही जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वांत लांब भिंत आहे. या भिंतीत जवळपास ३०० मंदिरे आहेत.

**६) कोलकत्यातील वडाचे झाड :**
कोलकत्याच्या बोटॅनिकल गार्डनमध्ये असलेले हे वडाचे झाड म्हणजे एक आश्चर्य आहे. हे वडाचे झाड म्हणजे एक जंगलच आहे. ते २०० वर्षे जुने आहे. ते इतके पसरले आहे, की त्याचा परीघ जवळपास २ किलोमीटर इतका आहे.

**७) चुंबकीय टेकडी- लडाख :**
लेह लडाख येथे असलेली चुंबकीय टेकडी हे एक मोठे आश्चर्य आहे. येथे एका विशिष्ट जागी न्यूट्रल गीअरमध्ये गाडी उभी केल्यास ती आपोआप या टेकडीकडे आकर्षित होते.

**८) कोडीन्ही गाव- केरळ :**
केरळमधील या २००० लोकवस्ती असलेल्या गावात तब्बल ३५० जुळ्यांचा जन्म झाला आहे. दर १००० लोकांमागे ४२ जुळ्यांचा जन्म या गावात नोंदविला गेला आहे.

**९) पंबन बेटावरचे तरंगते दगड- रामेश्वरम :**
रामेश्वरमनजीकच्या पंबन बेटावरून रामाने रामसेतू बांधला, अशी आख्यायिका आहे. याच बेटावर असे काही दगड आढळतात जे पाण्यावर तरंगतात. रामाने सेतू बांधण्यासाठी हेच दगड वापरले असावेत, अशी समजूत आहे.

**१०) झाडांच्या मुळांचे पूल- चेरापूंजी, मेघालय :**
मेघालयमधील लोकांनी येथील जंगलातील झाडांच्या विस्तृत मुळांना असा काही आकार दिला, की त्या मुळांचे साकव तयार झाले. गावातील लोक हे साकव दळणवळणासाठी वापरतात.

**११) लटकते खांब- लेपक्षी, आंध्र प्रदेश :**
आंध्र प्रदेशातील लेपक्षी मंदिरातील ७० खांबांपैकी एक खांब असा आहे, जो कोणत्याही आधाराशिवाय लटकतो. या खांबाच्या खालून एखादा कपडा किंवा ओढणीही आरपार जाऊ शकतो.

**१२) महाबलीपुरममधील झुलता दगड-तमिळनाडू :**
भौतिकशास्त्राच्या सर्व नियमांना तिलांजली देणारा एक मोठा खडक महाबलिपूरम येथे आहे. त्याला प्रेमाने कृष्णाचा लोण्याचा गोळा असेही म्हटले जाते. कोणत्याही आधाराशिवाय हा पाच मीटर व्यासाचा खडक एका उतरत्या पृष्ठभागावर गेली अनेक शतके उभा आहे.

**१३) बडा इमामबरा- लखनौ, उत्तर प्रदेश :**
लखनौतील १८ व्या शतकात बांधलेल्या या महालाचा राजदरबार ५० मीटर रुंद आहे. विशेष म्हणजे इतक्या रुंद दरबारात एकही खांब नाही. वास्तुविशारदांमध्ये या दरबाराच्या बांधकामाविषयी आश्चर्य व्यक्त केले जाते.

**१४) मोटारसायकल बुलेट बाबाचे मंदिर- राजस्थान :**
एका व्यक्तीच्या रस्त्यात झालेल्या अपघातानंतर त्याची बुलेट पोलिसांनी पोलीस स्थानकात आणली. दुसऱ्या दिवशी ती बुलेट अपघाताच्या ठिकाणी सापडली. पोलिसांनी ती पुन्हा आणून तिला साखळदंडांनी बांधून ठेवले. तरीही ती अपघाताच्या ठिकाणी गेली. ती कशी गेली याची कोणालाच माहिती नाही. आता मात्र या बुलेटची पूजा केली जाते. प्रत्येक वाटसरू या बुलेट बाबाला वंदन करतो आणि मगच पुढचा प्रवास करतो.

**१५) आशियातील स्वच्छ गाव- मावलिनॉंग, मेघालय :**
मेघालयमधील चेरापुंजीजवळ असलेले हे गाव आशियातील सर्वांत स्वच्छ गाव म्हणून प्रसिद्ध आहे. तसेच या गावात साक्षरतेचे प्रमाण १०० टक्के इतके असून, येथे प्रत्येकाला अस्खलित इंग्रजी बोलता येते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# जागतिक दिव्यांग दिनानिमित्त फापोरे येथे जनजागृती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- तालुक्यातील फापोरे येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक केंद्र शाळेत जागतिक दिव्यांग दिनानिमित्त बुधवार, ३ डिसेंबर रोजी जनजागृतीपर रॅली काढण्यात आली. गट शिक्षणाधिकारी रावसाहेब पाटील, शिक्षण विस्तार अधिकारी प्रमोद पाटील, गटसमन्वयक रवींद्र साळुंखे, केंद्रप्रमुख राजेंद्र गवते व मुख्याध्यापक सुनील जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

रॅलीतून दिव्यांगांचे २१ प्रकार, त्यांना मिळणाऱ्या सोयी- सुविधा याबाबत जनजागृती करण्यात आली. दहावी उत्तीर्ण विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये समतेची भावना निर्माण व्हावी, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. दिव्यांग विद्यार्थी व पालकांचा पुष्पगुच्छ देऊन तसेच विद्यार्थ्यांना शालेय भेटवस्तू देवु सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून नृत्य, चित्रकला, कोलाज, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. ज्ञानेश्वर शिंपी, श्रीमती दीपाली पवार, श्रीमती पूनम पाटील, शीतल भदाणे आदींनी सहकार्य केले.

# देवव्रत रेखे जगातील सर्वात बुद्धीमान मुलगा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगातील सर्वात हुशार आणि बुद्धिमान मुलांमध्ये ज्याची गणना होत आहे, याचे नाव आहे देवव्रत महेश रेखे. तो महाराष्ट्रातील अहिल्यानगर येथील रहिवासी आहे.
या १९ वर्षांच्या तेजस्वी बालकाने असे काय केले आहे? विद्वानांची नगरी असलेल्या काशीमध्ये (वाराणसी) हा बालक आपल्या गुरुपरंपरेतुन मिळालेले ऐतिहासिक, अद्भुत आणि विलक्षण पारायण सादर करत आहे. त्याच्या या कार्याने सर्व विषयांचे विद्वान आश्चर्यचकित झाले आहेत.

देवव्रतने कोणतेही पुस्तक न पाहता, कोणतीही चूक न करता, सलग ५० दिवसांपासून लीलया सुमारे २५ लाख पदे आणि करोडो शब्दांची राशी बोलून दाखवली आहे. सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे, गेल्या एक हजार वर्षांत हे पारायण करण्याची ही केवळ दुसरीच वेळ आहे.

तो एकाच वेगाने हा संपूर्ण पाठ सरळ तसेच उलट क्रमाने (दण्डक्रम) बोलत आहे! यालाच दण्डक्रम वेद पारायण असे म्हणतात. या अद्भुत आणि चमत्कारिक बालकाची चर्चा आज संपूर्ण भारतभर होत आहे. कोणी म्हणत आहे की, ही साक्षात भगवान बाबा विश्वनाथांची कृपा आहे. कोणी म्हणत आहे, की जणू माता सरस्वतीच त्याच्या जिभेवर नृत्य करत आहे!



# शास्त्रज्ञांनी शोधला पृथ्वी आणि मंगळ यांच्यातील वेळेचा फरक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मंगळावरील घड्याळीत किती वाजले? असा प्रश्न तुम्हाला विचारला तर तुमच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होईल. मात्र, शास्त्रज्ञांनी याचेही रहस्य उलगडले आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्टँडर्ड्स अँड टेक्नॉलॉजीच्या (एनआयएसटी) शास्त्रज्ञांनी प्रथमच पृथ्वी आणि मंगळ यांच्यातील वेळेतील फरक शोधून काढला आहे. मंगळावरील घड्याळे दररोज पृथ्वीपेक्षा सरासरी ४७७ मायक्रोसेकंद वेगाने प्रवास करतात. मंगळावरची वेळ नीट समजून घेण्याची गरज आहे. नासासारख्या अंतराळ संस्था आता बऱ्याच काळापासून या ग्रहावर मानव आणि रोबोट्स पाठवण्याच्या तयारीत आहेत. महान शास्त्रज्ञ आईनस्टाईन यांच्या सापेक्षतावादाच्या सिद्धांतामुळे भिन्न गुरुत्वाकर्षण असलेल्या ठिकाणी वेळ वेगळ्या प्रकारे कार्य करते. त्यामुळे मंगळावरील घड्याळे पृथ्वीप्रमाणे धावणार नाहीत. वेळेतील थोडासा फरक संप्रेषणापासून ते नेव्हिगेशनपर्यंत प्रत्येक गोष्टीवर परिणाम करू शकतो.

### मंगळाची वेळ कशी आहे?

मंगळ किती काळ आहे हे शोधणे सोपे वाटू शकते. मात्र, आपल्या विचारांपेक्षा हे अधिक कठीण आहे. एनआयएसटीचे शास्त्रज्ञ बिजुनाथ पटला आणि नील एशबी यांच्या मते, मंगळाची वेळ समजून घेण्याचे मुख्य कारण म्हणजे मंगळाचे गुरुत्वाकर्षण पृथ्वीपासून खूप कमकुवत आहे. हे कमी गुरुत्वाकर्षण काळाच्या गतीवर परिणाम करते. जेथे गुरुत्वाकर्षण प्रबळ असते तेथे घड्याळे संथ गतीने चालतात. तर गुरुत्वाकर्षण कमकुवत असते, तेथे घड्याळे अधिक वेगवान होतात.

### मंगळाची वेळ कशी ठरवली जाते?

मंगळाच्या वेळेवरही त्याच्या लंबवर्तुळाकार कक्षेचा प्रभाव पडतो आणि ही कक्षा पृथ्वीपेक्षा अधिक असामान्य आहे. यामुळे, मंगळावरील घड्याळाचा वेग दररोज २२६ मायक्रोसेकंदांपर्यंत चढ-उतार होतो. मंगळाच्या असामान्य कक्षेमुळे तेथील वेळ खूप बदलतो. मात्र, याउलट, चंद्राची कक्षा बऱ्यापैकी स्थिर राहते आणि म्हणूनच वेळेत ५६ मायक्रोसेकंदांचा बदल होतो.


### आईनस्टाईनची भूमिका काय आहे?

पृथ्वी आणि मंगळ यांच्यातील हा वेळेचा फरक थेट आईनस्टाईनच्या सिद्धांताचा परिणाम आहे. त्यात असे म्हटले आहे की, गुरुत्वीय बल आणि ग्रहाच्या कक्षेचा वेग या दोन्ही गोष्टींचा काळाच्या हालचालीवर परिणाम होतो.

बिजुनाथ पाटला म्हणतात, की चंद्र आणि मंगळासाठी हा फरक एकदम योग्य आहे. अगदी दूरच्या ठिकाणीही, वेळ- सांगणारी प्रणाली योग्यरित्या कशी जोडायची हे शोधून काढणे हे ध्येय आहे.

### संवादात विलंब किती काळ आहे?

सध्या पृथ्वी आणि मंगळ यांच्यातील दळणवळणाला ४ ते २४ मिनिटे विलंब झाला आहे. जर शास्त्रज्ञांनी या दोन ग्रहांमधील वेळ योग्यरित्या एकत्र केला तर हा विलंब आणखी कमी होऊ शकतो. पटला यांच्या मते, जर तुम्ही वेळेचे व्यवस्थापन केले तर ते रिअल टाइम संभाषणासारखे असेल ज्यामध्ये कोणतीही माहिती गमावली जाणार नाही.




### याचा काय फायदा होईल?

समन्वयाची ही पातळी गाठणे हे अंतराळ संशोधनात मोठे यश असेल. यामुळे पृथ्वी आणि मंगळ यांच्यात जलद आणि अधिक कार्यक्षम संपर्क प्रणाली निर्माण होईल. ज्यातून माहिती वेळेवर आणि न गमावता उपलब्ध होईल. तसेच, संपूर्ण सौर यंत्रणेत संप्रेषण नेटवर्क तयार करण्यास मदत होईल.

# जगातील सर्वात महागडा 'या' पक्ष्याचा पंख

**किंमत सोन्यापेक्षाही जास्त..!**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



जगातील सर्वात महागडा पक्ष्याचा पंख सध्या चर्चेत आहे. हा पंख न्यूझीलंडमधील हुईया पक्ष्याचा आहे. नुकत्याच झालेल्या लिलावात या ९ ग्रॅम वजनाच्या पंखाची किंमत सोन्याच्या भावापेक्षाही जास्त पटीने अधिक लावण्यात आली. हुईया पक्षी न्यूझीलंडचा स्थानिक होता. त्याचे पंख एकेकाळी माओरी संस्कृतीत शाही प्रतीक मानले जात होते. काळ्या चमकदार पंखांसाठी आणि पांढऱ्या टोकाच्या लांब शेपटीच्या पिसांसाठी हा पक्षी ओळखला जातो. या पंखाचा लिलाव सुमारे २७ लाख रुपयांमध्ये झाला. या किमतीचे मुख्य कारण म्हणजे हुईया पक्षी २० व्या बातकाच्या सुरुवातीलाच लुप्त झाला. त्यामुळे या पक्ष्याशी संबंधित कोणतीही वस्तू अत्यंत दुर्मीळ, ऐतिहासिक आणि अनमोल मानली जाते.माओरी जमातीत हे पंख सन्मान आणि उच्च सामाजिक स्तराचे प्रतीक होते.या अनोख्या आणि सुंदर पंखाने आपल्या वैशिष्ट्यांमुळे सर्वांचे लक्ष वेधले आहे.









## पुण्यभूमी श्रीक्षेत्र नृसिंहवाडी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पंचज्ञानेंद्रिय आणि पंचकर्मेंद्रिये या ठिकाणी असलेल्या देवताच त्या-त्या अवयवांद्वारे केल्या जाणाऱ्या कार्यांना प्रवृत्त करीत असतात. अशा वेळी शरीरातील प्रत्येक अवयवाला स्पर्श करून त्या-त्या ठिकाणी वसलेल्या देवतांचे स्मरण करायचे आणि विधायक कार्यासाठी धार्मिक कार्याच्या परिपूर्तीसाठी सामर्थ्य मिळवायचे. धर्माचरण यासाठी आपली ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये सिद्ध करायची आणि कार्याला पूर्णत्व आणायचे. इतके व्यापक आणि गहन तत्त्व महान्यासामध्ये लपलेले आहे. जेव्हा लघुरुद्र असतो तेव्हा लघुन्यास व जेव्हा महारुद्र अनुष्ठान असेल तेव्हा महान्यास करण्याची पद्धत आहे.

वाडी क्षेत्रीय अनुष्ठान सोहळ्यावेळी रुद्र, पवमान, श्रीसूक्त अशा समग्र वैदिक ऋचा आणि श्रीगुरुपादुकांना सतत अभिषेक सुरू असतो. यामुळे महान्यास करून, स्वतःला देवरूप बनवून, मगच देवाची पूजा-अर्चा करायची हा श्रद्धाभाव न्यासामध्ये अनुस्यूत आहे. न्यासेनापिववे सोऽऽपि स्वयमेव जनार्दन या तत्त्वानुसार महान्यास विधी केला जातो.

पादुकांवर अकरा धारांचे चांदीचे अभिषेक पात्र बांधलेले असते. श्रीमहादेव, गणपती व शिरोळ पादुका यांच्यावरही अभिषेक पात्रांची योजना केलेली असते. पादुकांवरील अभिषेकपात्रातील पाणी अकरा धारांतून पडत असल्याने दर दहा-बारा मिनिटांनी त्यात घागरभर पाणी घालावे लागते. पाटावरील पुजारी, अभिषेक पात्रांत हंड्याने पाणी भरत असलेला पुजारी आणि त्यामध्येच रुद्र, पवमान करणारे पुजारीजन दाटीवाटीने बसलेले. सकाळी अकरा वाजतात अन् समूह स्वरातील रुद्रावर्तनाचे शांतीमंत्र साऱ्या परिसराला व्यापून टाकतात.

उत्पत्ती-स्थिती-लय यांचे एकत्व म्हणजे श्रीदत्त. शैव वैष्णव शाक्त यांचे अभिन्नत्व म्हणजेच श्रीदत्त. जाती, धर्म, संप्रदायविरहित श्रद्धेची परिणती म्हणजे दत्त. खरेच दत्त म्हणजे सर्वात्मका सर्वेश्वरा. दत्त म्हणजे परमात्मा परंज्योती. अशा या दैवताला रुद्र, पवमान, श्रीसूक्त, विष्णूसूक्त अशा विविध ऋचांनी गौरविणारा हा संततधार सोहळा, वाडीच्या वार्षिक उत्सवातील कौस्तुभमणीच.



## अर्जुनाचा अश्वमेध यज्ञ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वेदधर्मामुनी आपला प्रिय शिष्य संदीपाकाला सांगतात, की धार्मिकाग्रणी, विवेकशील राजा अर्जुन आपल्या आत्मानुसंधानात थोडाही खंड पडू न देता निरंतर धर्मकार्यात मग्न असे. प्रजेचे पालन पोटच्या अपत्याप्रमाणे करीत असे. सोबतच अनेक यज्ञ, व्रतवैकल्यादी, तपाचरण, दान, ब्राह्मणांची पूजा, त्याला विशेष आवड असलेले यज्ञांचे अनुष्ठान, तसेच दत्तप्रभूंना आणखी प्रसन्न करण्यासाठी अश्वमेध यज्ञही करायला घेतला. कार्तवीर्याने सोडलेला शामकर्ण अश्वमेधाचा घोडा अडविण्याचे साहस भूमंडळात कोणाचेच नसल्यामुळे त्याचे अश्वमेध यज्ञ निर्विघ्न यथासांग पार पडले. शंभर अश्वमेध यज्ञ करणारा सम्राट स्वर्गाचा अधिपती होतो.

आपले आसन अर्जुन बळकावेल, ही भीती वाटल्याने इंद्राने देवसभा बोलावून अर्जुनाला ब्राम्हण प्रिय असल्यामुळे कोणत्यातरी देवाने ब्राह्मणरूपात त्याच्याकडे जाऊन अशी काही मागणी करावी की ज्यामुळे त्याचा अधःपात होऊन पुण्याचा क्षय होईल. अखंड धर्शाचराने त्याचे दिवसेंदिवस वाढणाऱ्या बळाचे खच्चीकरण करण्याचा हाच एक उपाय आहे, असा सर्वानुमते ठराव झाल्यावर सर्वांत प्रभावी भगवान सूर्यदेवाची योजना केली.

सर्व देवांच्या आग्रहाने सूर्यदेव अर्जुनाची राजधानी महिष्पतीला आले. सकाळची धार्मिक कृत्ये आवरून भोजनाच्या आधी वैश्वदेव राजा अर्जुन बलीहारण करायला बाहेर येण्याची नेमकी वेळ साधून अत्यंत कृश, पोट खयाटीला व डोळे खोल गेलेले अशा ब्राह्मणस्वरूपात सूर्यदेव राजासमोर उभे राहिले. इतकी दुर्दशा या ब्राह्मणाची कशाने झाली? काय अपेक्षेने आला? असा विचार करत राजाने त्या भूदेवाला नमस्कार करून विचारल्यावर अत्यंत क्षीण आवाजात तो ब्राह्मण म्हणाला, की हे राजा, तू अतिथी सत्कारात कसलीही उणीव ठेवत नाहीस, अशी तुझी कीर्ती ऐकून आलो आहे. तू उदार, दानशूर, दयाळू असल्याचा लौकीक त्रैलोक्यात पसरला आहे. राज्य, धन, पुत्र किंवा स्री इतकेच काय स्वतःच्या नाशवंत शरीराचा लोभ न धरता दान करण्यास तू मागे-पुढे पाहत नाहीस. मला तृप्त करशील या गाढ विश्वासाने मी आलो आहे.

राजा म्हणाला, की ब्राह्मण माझे दैवतअसून आपली तृप्ती करण्यास हा देह कारणी लागला, तरी आपली क्षुधा शांत करीन. त्यावर ब्राह्मण म्हणाला, कि राजा, तुझ्या सात द्वीपांच्या राज्यातील सर्व वृक्ष, वेली खायला दिल्यास माझी क्षुधा शमेल.

हे जगावेगळे मागणे ऐकून अर्जुनाने ओळखले, की जसे बळीच्या दारी याचक वेषाने गेलेले भगवान विष्णूंसारखाच हा ब्राह्मणसद्धा याचकाच्या वेषातील कोणी श्रेष्ठ देव आपल्या दारी आला आहे. देवांनाही उपकृत करण्याची संधी मिळत असलेली पाहून सर्वज्ञ राजाने त्याच्या तेजावरून तो सूर्यदेवच असावा, असे अनुमान करून आपली इच्छा अवश्य पुरवीन. पण आपण कोण आहात? मी दिवाकर भट. लोकालोक पर्वतावरून भूक मिटविण्यासाठी थेट तुझ्याकडे आलो. लोकालोक पर्वत हे सूर्याचे स्थान. राजा हर्षित झाला. गृहस्थाश्रमाचे सार्थक झाले. प्रत्यक्ष सूर्यनारायण याचक म्हणून दारी आले. यापेक्षा मोठे भाग्य कोणते? वनस्पतीचे काय? दत्तप्रभूंच्या कृपेने ज्या सिद्धी मिळाल्या आहेत त्या प्रभावाने परत निर्माण करता येतील, हा विचार करून पृथ्वीवरील सर्व वृक्षांचे दान करण्यास अर्जुन सज्ज झाल्यावर सूर्यनारायण देवता रूपात प्रकट झाले.

# भक्ताच्या उद्धारासाठी त्रिमूर्तींनी घेतला श्री दत्तात्रय अवतार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

या कलियुगात भक्ताचा उध्दार करण्यासाठी आद्य देव श्री ब्रह्मा, विष्णू, शिव या त्रिमूर्तींनी श्री दत्तात्रय याचा अवतार घेतला. ब्रह्मदेव 'चंद्र' झाला. श्रीविष्णू 'दत्त' झाला आणि महेश 'दुर्वास' झाला. काही दिवसांनी चंद्र व दुर्वास मातेला म्हणाले, "आम्ही दोघे तपाला जातो. तिसरा 'दत्त' येथेच राहील. तोच त्रिमूर्ती आहे असे समज." अनुसूयेने अनुज्ञा दिली असता चंद्र व दुर्वास ताप करण्यासाठी निघून गेले. त्रिमूर्ती दत्त मात्र आई-वडिलांची देव करीत तेथेच राहिले. ब्रह्मदेव आणि शंकर यांनी आपापले दिव्य अंश दत्ताच्या ठिकाणी स्थापन केले. तेव्हापासून दत्त अत्री-अनुसूयेचा पुत्र, श्रीविष्णूंचा अवतार असूनही त्रिमूर्ती दत्तात्रय म्हणून एकत्वाने राहिले. अत्री म्हणून आत्रेय व अत्री-अनुसूयेला देवांनी तो दिला म्हणून ' दत्त ' तो दत्तात्रय महाप्रभू हाच गरू परंपरेचे मूळ पीठ आहे.



श्रीदत्तात्रय यांच्यापासून पुढे तीन अवतार झाले. प्रथम श्रीगुरू श्रीपाद श्रीवल्लभ महाराज हा अवतार द्वितीय श्रीगुरू नृसिंहसरस्वती महाराज व तिसरा अवतार श्री स्वामी समर्थ महाराज हे तिन्ही अवतार श्रीगुरू दत्तात्रय याचेच आहेत.

श्रीपाद श्रीवल्लभ यांचा जन्म भाद्रपद शुक्लपक्ष चतुर्थीला झाला. गणेश चतुर्थीला झाला. कृष्ण-यजुर्वेद शाखा आपस्तंब सूत्र, भारव्दाज गोत्र भव ब्रह्मश्री घंडिकोटा अप्पालराज शर्मा आणि महाराणी सुमतीदेवी यांच्या पोटी झाला. या अवताराची माहिती गुरुचरित्रात, पाच, आठ, नऊ व दहा या चार अध्यायात आलेली आहे.

श्रीदत्तांचा पहिला अवतार असलेल्या श्रीपाद वल्लभांबद्दल मात्र खूपच कमी माहिती ठाऊक आहे. भगवान दत्तात्रय जगदोद्धारासाठी इ. स. १३२० मध्ये आंध्र प्रदेशातील पूर्व गोदावरी जिल्ह्यात पीठापूर नावाच्या गावात आपळराज नावाचा एक आपस्तंभ शाखेचा ब्राह्मण होता. त्याच्या धर्मपत्नीचे नाव सुमती. ती मोठी सदाचरणी व पतिव्रता होती. अतिथी-अभ्यान्गताची ती मनोभावे सेवा करीत असे. दोघेही सत्वगुणी होते. ती श्रीविष्णूंची आराधना- उपासना करीत असे. एके दिवशी मध्यान्हकाळी श्रीदत्तात्रय अतिथीवेषात तिच्या घरी भिक्षेसाठी आले. त्या दिवशी अमावस्या होती. त्या दिवशी तिच्या घरी श्राद्ध होते. श्राद्धासाठी बोलाविलेले ब्राह्मण अद्याप यावयाचे होते. दारी आलेला अतिथी आलेला आहे हे पाहून सुमतीने त्या अतिथीचे स्वागत करून त्याला श्राद्धासाठी जो स्वयंपाक तयार केला होता त्याची भिक्षा वाढली. त्यामुळे प्रसन्न झालेल्या अतिथीवेषातील श्रीदत्तात्रयांनी तीन शिरे, सहा हात अशा स्वरूपात दर्शन दिले. आज आपल्या घरी प्रत्यक्ष श्रीदत्तप्रभू जेवले हे पाहून सुमतीला अतिशय आनंद झाला. तिने श्रीदत्तात्रयांना साष्टांग नमस्कार घातला. प्रसन्न झालेले श्रीदत्तात्रय तिला म्हणाले, "माग माते जे इच्छिसी । जे जे वासना तुझे मन पावसी । पावसी त्वरित म्हणतसे॥
" माते, मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. तुला जे हवे असेल ते माग. "

श्रीदत्तात्रयांनी असे आश्वासन दिले असता सुमती अत्यंत विनम्रपणे भगवान दत्तप्रभूंना म्हणाली, " भगवंता, आपण मला 'जननी' म्हणालात तेव्हा ते नाव सार्थ करावे... माझ्या पोटी आपण जन्म घ्यावा. मला पुष्कळ पुत्र झाले, परंतु ते जगले नाहीत. त्यातून दोन पुत्र वाचले आहेत, पण त्यातील एक आंधळा आहे व दुसरा पांगळा आहे. ते असून नसल्यासारखे आहेत, म्हणून मला आपल्यासारखा विश्ववंद्य, परमज्ञानी, देवस्वरूप असा पुत्र व्हवा." सुमतीने अशी प्रार्थना केली असता प्रसन्न झालेले श्रीदत्त्प्रभू पुढील धर्मकार्याचे स्मरण होऊन तिला म्हणाले, "माते, तुला मोठा तपस्वी पुत्र होईल. तुझ्या वंशाचा उद्धार करील. कलियुगात त्याची फार मोठी कीर्ती होईल. परंतु तुम्ही जो सांगेल तसे करा. नाहीतर, तो तुमच्याजवळ राहणार नाही. तुमचे सगळे दैन्य-दुःख दूर नाहीसे करेल." असा सूचक आशीर्वाद देऊन अतिथीरुपी श्रीदत्तात्रेय अदुष्य झाले. हे वरदान ऐकून सुमतीला अतिशय आनंद झाला.

काही कामासाठी बाहेर गेलेला आपळराजा घरी परतला. सुमतीने त्याला सगळी हकीगत सांगितली. मध्यानकाळी कोणी अतिथी आल्यास त्यला भिक्षा घालण्यास चुकू नको असेही श्रीदत्तात्रेयांनी सांगितले होते. त्याचप्रमाणे माहूर, करवीर, पांचाळेश्वर या ठिकाणी श्रीदत्तात्रयांचा निवास असतो आणि जे कोणी भिक्षा मागावयास येईल त्याला श्रीदत्तप्रभू मानून भिक्षा घालावी असेही त्यांनी सांगितले होते. सुमतीने सांगितलेली हकीगत ऐकून आपळराजा अतिशय आनंदित झाला. तो सुमतीला म्हणाला, "तू अगदी योग्य तेच केलेस. आज श्राद्ध खऱ्या अर्थाने सफल झाले. माझे पितर आज एकाच भिक्षेने तृप्त झाले. कारण आज आपल्याकडे श्रीदत्तरुपी प्रत्यक्ष विष्णूच आले होते. हे सुमती, तुझे मातापिता खरोखर धन्य आहेत. तुला जो वर मिळाला तसाच पुत्र तुला होईल. पुढे यथाकाली सुमती गर्भवती झाली. नवमास पूर्ण झाल्यावर एका शुभदिवशी (भाद्रपद शुक्ल चतुर्थी) सुमती प्रसूत झाली. तिअल एक पुत्र झाला. त्याचे जातकर्म करण्यात आले. आपळराजाने खुप दानधर्म केला. विद्वान ब्राम्हणांनी त्याची जन्मपत्रिका तयार करून त्याचे भविष्य वर्तवले. 'हा मुलगा दीक्षाकर्ता जगद्गुरु होईल.' असे त्याचे भविष्य सांगितले. भगवान दत्तात्रयांनी वर दिल्याप्रमाणे हा मुलगा झाला हे ध्यनात घेऊन त्या नवजात बालकाचे नाव 'श्रीपाद' असे ठेवले. हे भगवान दत्तात्रेय असून लोकोद्धारासाठी अवतीर्ण झाले आहेत हे आपळराजा व सुमती यांने समजले. अत्यंत आनंदाने ते श्रीपादाचे संगोपन करीत होते.

यथावकाश श्रीपाद सात वर्षांचा झाला... मग आपाळराजाने त्याचे यथाशास्त्र मौजीबंधन केले. मुंज होताच श्रीपाद चारही वेद म्हणू लागला. तो न्याय, मीमांसा, तर्क इत्यादी दर्शनशास्त्रांत पारंगत झाला. त्यावर भाष्य करू लागला. आचारधर्म, व्यवहारधर्म, प्रायश्चित्ते, वेदांत इत्यादींचे ज्ञान तो लोकांना समजावून देऊ लागला. श्रीपादाची असामान्य बुद्धिमत्ता पाहून लोक आश्चर्याने थक्क झाले. त्याच्या मुखातून ज्ञान श्रवण करण्यासाठी आणेल लोक पीठापुरास येऊ लागले. श्रीपाद सोळा वर्षांचे झाले. माता-पित्यांनी श्रीपादांच्या विवाहाबद्दल चर्चा सुरु केली. त्यांनी श्रीपादांना विवाहाविषयी विचारले, त्यावेळी ते म्हणाले, "मी विवाह करणार नाही. मी वैराग्य स्त्रीशी विवाह केला आहे. मी तापसी ब्रम्हचारी, योगश्री हीच आमची पत्नी होय. माझे नावच श्रीवल्लभ आहे. मी आता तप करण्यासाठी हिमालयात जाणार आहे." हे ऐकून आई-वडिलांना खूप वाईट वाटले. परंतु 'तुला ज्ञानी पुत्र होईल. तो सांगेल तसे वागा.' हे श्रीदत्तप्रभूंचे शब्द सुमतीला आठवले. या मुलाचा शब्द आपण मोडला तर काहीतरी विपरीत होईल तेव्हा याला अडवून चालणार नाही. असा विचार करून आई-वडील त्यांना म्हणाले, "बाळा, तू आमच्या म्हातारपणी आमचा सांभाळ करशील अशी आम्हाला आशा होती. पण आम्ही तुला अडवीत नाही." आपल्याला पुत्रवियोग होणार या विचाराने सुमती दुःख करू लागली. तेव्हा श्रीपाद तिला समजावीत म्हणाले, "तुम्ही कसलीही चिंता करू नका. तुम्हाला हवे असेल ते मिळेल." मग त्यांनी आपल्या आंधळ्या व पांगळ्या बंधूंकडे अमृतदृष्टीने पहिले. आणि त्याचक्षणी परिस्पर्शाने लोखंडाचे सोने होते त्याप्रमाणे त्या दोघा भावांना दिव्य देह प्राप्ती झाली. आंधळ्याला दृष्टी आली व पांगळ्याला पाय आले. त्या दोघांनी श्रीपादांच्या चरणकमलांवर डोके ठेवले. 'आम्ही आज कृतार्थ झालो, धन्य झालो.' असे ते म्हणाले. श्रीपादांनी त्यांच्या मस्तकावर वरदहस्त ठेवून आशीर्वाद दिला.

"तुम्हाला पुत्रपौत्रांसह सर्वप्रकारची सुखसमृद्धी प्राप्त होई. तुम्हाला दीर्घायुष्य प्राप्त होईल. तुम्ही चिरकाल सुखाने नांदाल. तुम्ही आई-वडिलांची सेवा करा. तुम्ही परमज्ञानी व्हाल. शेवटी तुम्हाला मोक्ष प्राप्त होईल." मग ते आई-वडिलांना म्हणाले, "या दोन्ही मुलांच्या सहवासात राहून तुम्ही शतायुषी व्हाल. आता मला परवानगी द्या. मी उत्तरदिशेला जात आहे. अनेक साधुनानांना मी दीक्षा देणार आहे." सर्वजण श्रीपादांच्या पाया पडले. श्रीपाद श्रीवल्लभ घरातून बाहेर पडले एकेकी गुप्त झाले.

'श्रीगुरुचरित्र' या मराठी ग्रंथामध्ये त्यांच्याबद्दल फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. दत्तभक्त व सामान्य लोकांना कारंजा क्षेत्राचे श्रीनृसिंह सरस्वती आणि अक्कलकोट क्षेत्राचे श्री स्वामी समर्थ हे दत्तगुरूंचे दोन अवतार चांगले माहीत आहेत. पण पहिला अवतार असलेल्या श्रीपाद वल्लभांबद्दल मात्र खूपच कमी माहिती ठाऊक आहे. या पार्श्वभूमीवर श्रीपाद श्री वल्लभांच्या अलौकिक कार्याचा तसेच पीठापूरम या त्यांच्या जन्मक्षेत्रांचा थोडक्यात घेतलेला धांडोळा उद्बोधक आणि अनेकांच्या माहितीत नव्याने भर टाकणारा ठरेल अशी अपेक्षा आहे. त्यांचे समकालीन असलेल्या शंकर भट्ट यांनी लिहिलेले चरित्र संस्कृत भाषेत होते आणि नंतर त्याचा तेलुगु भाषेत अनुवाद झाला.

पिठापुरम येथे १६ तर कुरवपूर येथे १४ वर्षे अशा अवघ्या ३० वर्षांच्या कालावधीत अद्भूत असे लीलाचरित्र दाखवून त्यांनी इह-पर लोकातील सर्वांना शाश्वत सुख प्रदान केले. त्यांच्या बाललीला प्रत्यक्ष भगवान बालकृष्णाच्या लीलेसारख्या अत्यंत मधुर आणि अद्भूत आहेत. पुढे जप, तप, ध्यान, तपस्या या सर्वांचे फल स्वतःला न घेता सृष्टीला देत आपल्या भक्तांची आश्वीव्याप्तीतून सुटका करण्यासाठी त्यांनी आपले तपोबळ सहस्त्रपटीने वाढविले. आपल्या दिव्य अगम्य आणि मानवाच्या दृष्टीने अनाकलनीय असलेल्या लीलांद्वारे जनता जनर्दानाच्या उद्धारासाठी त्यांनी आपले आयुष्य घातले. पाण्यावरून चालणे, व्यंग व्यक्तीस अव्यंगता प्राप्त होणे, उपस्थितांसाठी शिजवलेले अन्न कमी असूनही ते सर्वांना पुरून शिल्लक राहणे, लांबच्या प्रवासातही दूध, दही, लोणी खराब न होता नीट राहणे, अंध व्यक्तीस दृष्टी प्राप्त होणे, मृत जीवास जीवनदान देणे अशा कितीतरी प्रकारच्या चमत्कृतीपूर्ण लीलांनी त्यांचे आयुष्य भरलेले दिसते. या दिव्य लीलांच्या प्रकटनातून प्रामुख्याने संत-सज्जनांचे संरक्षण, कर्ममार्गाचे आचरण, गर्वहरण, दुष्टांचे निर्दालन, अस्पृश्यता निवारण, सत्कर्माचे प्रचारण, भूदान व अन्नदानाचे महत्त्व, नामस्मरणाचा महिमा, भूत-पिशाच्च बाधांचे निर्मूलन आदि अनेक गोष्टींचा संदेश दिला. आंध्र प्रदेशातील पीठापुरम येथे या दैवी बालका ने बालवयात म्हणजे सोळाव्या वर्षाच्या आतच सकळ शास्त्रात विशेषतः वेदान्दात प्रावीण्य मिळविले. नंतर समस्त मानवजातीच्या कल्याणासाठी भारत भ्रमण केले.

पिठापुरम येथील देखण्या मंदिरातील श्रीपाद श्रीवल्लभांच्या मूर्तीच्या पवित्र दर्शनाने भक्तांच्या डोळ्याचे पारणे फिटते... तेथे भक्तांना अभिषेक करता येतो. मंदिराच्या प्रांगणात औदुंबर वृक्ष असून तेथे दत्तांच्या पादुका आहेत. पीठापुरम या पवित्र तीर्थक्षेत्री अत्यंत प्राचीन असे कुक्कुटेश्वराचे दगडी मंदिर आहे. त्यासमोरच एक तलाव आहे.


समस्त कल्याणकारी गुणांनी युक्त अशा वासवांबिकेस श्रीपाद प्रभू म्हणाले ''तुझा संकल्प सिध्द होईल ! मी आणखी चौदा वर्षे म्हणजे या शरिराला तीस वर्ष येईपर्यंत श्रीपाद श्रीवल्लभ या रूपांतच राहून त्या नंतर गुप्त होईन... त्यानंतर संन्यास धर्माच्या उध्दाराच्या निमित्ताने नृसिंहसरस्वती ह्या नावाने ओळखला जाईन. ह्या दुसऱ्या अवतारात ८० वर्षे राहीन, या अवतार समाप्तीनंतर कर्दळी वनात 300 वर्ष तपोनिष्ठेत राहून प्रज्ञापुरात (अक्कलकोट) स्वामी समर्थ या नावाने अवतार धारण करीन. अवधूत अवस्थेत सिध्दपुरुषांच्या रूपाने, अपरिमित अशा दिव्यकांतीने, अगाध लीला, दाखवीन. साऱ्या जगाला धर्म कर्माला अनुसरून, त्या विषयी आसक्तीरहित करीन.''

भगवान श्रीपाद श्री वल्लभ स्वामींनी आश्विन कृष्ण द्वादशीस अवतार समाप्त केला.

# दत्तसंप्रदाय एक प्रासादिक अनुभूती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्रात दत्तभक्तीचा प्रसार जातिभेदातीत, संप्रदायातीत, किंबहुना धर्मातीत आहे. नाथसंप्रदाय, महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय आणि समर्थ संप्रदाय या चारही संप्रदायांत दत्तात्रेयांविषयी गाढ श्रद्धा आहे... तसेच, दत्तभक्तीचीच परंपरा विशेष करून चालविणारा दत्तसंप्रदायही महाराष्ट्रात शेकडो वर्षे अस्तित्वात आहे. या संप्रदायात दत्तात्रेयांना आपले उपास्य दैवत मानणाऱ्या दत्तभक्तांत हिंदूंबरोबर मुस्लिमांचाही समावेश आहे.दत्तात्रेय हे जरी महाराष्ट्रातील भक्तप्रिय दैवत असले तरी त्याच्या उपासनेला सर्वाधिक प्रेरणा मिळाली, ती श्रीनरसिंह सरस्वतींच्या अवतारामुळे. त्यांच्यानंतरच महाराष्ट्रात दत्तसंप्रदाय उदयाला आला. औदुंबर, नरसोबा वाडी व गाणगापूर ही या संप्रदायाची प्रमुख तीर्थस्थाने बनली.



नृसिंह सरस्वतींच्या अवतारामुळे जो दत्तोपासनेचा प्रवाह प्रवर्तित झाला, त्या प्रवाहाशिवाय दत्तोपासनेच्या क्षेत्रात अन्य प्रवाह निर्माण झाले आणि वाढत राहिले; परंतु त्यांचे स्वरूप व्यापक नसल्यामुळे ते वैयक्तिक उपासनेपुरतेच मर्यादित राहिले आणि म्हणूनच त्यांना संप्रदायाचे स्वरूप प्राप्त झाले नाही... दत्तसंप्रदायाच्या स्वरूपावर दत्तात्रेयांच्या मूलस्वरूपाचा प्रभाव विशेष आहे, ते तर खरेच; परंतु त्याच्या घडणीत, विचारआचारात दत्तावतारी महापुरुषांचाही सिंहाचा वाटा आहे. दत्तात्रेयांच्या मूलस्वरूपात पौराणिक कल्पनेनुसार चातुर्वर्ण्यसंरक्षणावर विशेष भर आहे. पुराणांनी वारंवार असे प्रतिपादले आहे, की दत्तात्रेयांचा अवतार हा चातुर्वर्ण्याच्या संवर्धनासाठी झालेला आहे.

ज्या काळात श्रीनृसिंह सरस्वतीचा अवतार झाला, त्या काळात ' कठीण दिवस युगधर्म । म्लेंच्छराज्य क्रूर कार्य ' अशी परिस्थिती सर्वत्र होती... परिणामी ब्राह्मण वर्ग आचारदृष्ट्या शिथिल होऊ लागला होता. अशा परिस्थितीत श्रीनृसिंह सरस्वतींनी वैदिक परंपरेच्या पुनरुज्जीवनासाठी व संरक्षणासाठी वर्णाश्रम धर्माला प्राधान्य दिले. 'धर्मो रक्षति रक्षतः' ही त्यांची त्यामागची प्रमुख भूमिका होती. दत्तसंप्रदायाचे उपास्य असलेले दत्तात्रेय हे एक योगी असल्यामुळे या संप्रदायात स्वाभाविकच योगालाही प्राधान्य मिळाले. अगदी चांगदेव राऊळांपासून आजपर्यंत झालेले बहुतेक महान दत्तोपासक योगी होते. नाथसंप्रदायाने तर दत्तात्रेय ही योगप्रदायक देवताच मानली आहे. नाथसिद्धांविषयी जनमानसात असा समज रूढ आहे, की ते योगसामर्थ्याने अद्भुत चमत्कार करू शकतात.

दत्तोपासनेमुळेच अशा सिद्धी दत्तोपासकांना प्राप्त होतात आणि त्यांच्या साहाय्याने ते आपली दुःखे दूर करू शकतात, आपल्या कामनांची पूर्ती करू शकतात, ही जी भावना सर्वसामान्यांच्या मनात प्रथमपासून रुजत गेली त्यातच दत्तसंप्रदायाच्या भक्तप्रियतेचे रहस्य दडलेले आहे... केवळ दर्शन-स्पर्शनाने वा आशीर्वादाने सिद्धपुरुषांनी आपल्या व्यथा-वेदना त्वरित नाहीशा करून मनोकामना पूर्ण कराव्यात, अशीही बहुतेक भक्तांची किमान अपेक्षा असते. दत्तात्रेयांची उपासना गुरुस्वरूपात करावयाची असते. कारण ते 'गुरुदेव' आहेत. परिणामी गुरुसंस्थेला प्राधान्य देणाऱ्या सर्व संप्रदायात दत्तात्रेयांची पूज्यता रूढ झाली.

दत्तसंप्रदाय हा प्रत्यक्षवाई, सगुणवादी आहे. जीवनाला आवश्यक असलेल्या मंत्रशास्त्राचे संवर्धन करण्याचे महान कार्य आजवर दत्तसंप्रदायाने केले आहे. आपल्या भारतात जे अनेकानेक धार्मिक संप्रदाय आहेत त्यात 'दत्तसंप्रदाय' हा एक प्रमुख संप्रदाय मानला जातो. यालाच ' अवधूत संप्रदाय ' असेही संबोधले जाते. 'दत्तात्रेय' हे या संप्रदायाचे आराध्य दैवत होय !शैव, वैष्णव व शाक्त या तीनही उपासना प्रवाहांना व्यापणारा दत्तात्रेयांचा प्रभाव सर्व भारतभर गाजत आहे. आपल्या महाराष्ट्रात दत्तभक्तीचा प्रसार जातिभेदातीत, सांप्रदायातीत किंबहुना धर्मातीत आहे. महानुभाव, नाथ, वारकरी आणि समर्थ संप्रदायात दत्तात्रेयांविषयी उत्कट श्रद्धाभाव आहे. दत्तात्रेय हे विष्णूचे अंश असून अत्रि अनसूयेचे पुत्र आहेत; परंतु ते अयोनिसंभव आहेत. महाभारतात वन, शांति व अनुशासन पर्वात दत्तात्रेयांनी सहस्त्रार्जुनावर कृपा केल्याचा उल्लेख आढळतो.

गुंतागुंतीचा आणि रहस्यमय दत्तसंप्रदाय हा संप्रदाय बराचसा अगम्य, काहीसा गुंतागुंतीचा आणि तितकाच रहस्यमय आहे... वास्तविक उत्तर भारत हा वैष्णवपंथी असून दक्षिण भारत शैवपंथी मानला जातो. या दोन्ही पंथांचा समन्वय दत्तसंप्रदायात झालेला दिसून येतो. या संप्रदायाची मुळे जरी महाराष्ट्रात रुजलेली असली तरी गुजरात, कर्नाटक व आंध्रमध्येही दत्तोपासना मोठ्याप्रमाणात विस्तारलेली आहे. सौराष्ट्रातील जुनागढजवळचे ' गिरनार ' हे या संप्रदायाचे प्राचीन स्थान असून जैन, मुस्लिम, हिंदू, बौद्ध संस्कृतींचा समन्वय असलेल्या या जागी दत्तात्रेयांचे मूळ स्थान आहे.